## माहे मे २०२२ महाचा मासिक अहवाल
## मासिक अहवालामध्ये खालील घटकाने चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | जालना | लुसी (डॉबरमन) | पो.शि. /१५७४ एस.एम.पल्लेवाड | पोलीस स्टेशन कदीम जालना, जिल्हा जालना गु.र.नं. २५४/२०२२ भा.दं.वि. कलम ३९५, ३४ हा गुन्हा दिनांक १६/०५/२०२२ रोजी १६/२१ वा. दाखल असुन सदर गुन्हयातील घटनास्थळावर मिळालेल्या हात रूमालाचा श्वान लुसी हिस वास दिला असता श्वान लुसीने सदरचे वासवरुन बाजुस उभे असलेला इसम नामे गणेश ऊर्फ संजू सातारे याचे अंगावर झेप घेवुन भुंकून पुढे जावुन जीना चढून वरील खोलीत प्रवेश करून बेडरूम मध्ये जावुन सगळीकडे फिरून येवुन पुन्हा संशयित इसम नामे गणेश ऊर्फ संजू सोनारे याचे अंगावर झेप घेवुन भुंकून इशारा दिला. सदर आरोपीकडे अधिक तपास केला असता नमुद आरोनी नामे गणेश सातारे व त्याची पत्नी सिमा सातारे व मुलगा राजेंद्र सातारे यांना अटक करून मृतक भारती व मुलगी वर्षा यांचे चारित्र्यावर संशय घेवुन काहीतरी वस्तुने मारहाण करून जिवे मारल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | नंदुरबार | लकी (डॉबरमन) | पो.हवा. /८०३ एस.एम. डांगरे पो.ना. /६५६ बी.डी.गावीत | पोलीस स्टेशन नंदुरबार शहर, जिल्हा नंदुरबार गु.र.नं. २७८/२०२२ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७,३८० हा गुन्हा दिनांक १३/०५/२२ रोजी १३/४५ वा. दाखल असुन सदर गुन्हयातील घटनास्थळी आरोपीने हाताळलेले मिक्सरचे भांडे ज्यात चोरीस गेलेली रोख रक्कम ठेवलेली होती त्या भांडयाचा वास श्वान लकी यास दिला असता श्वान लकी संपुर्ण घरात फिरून घराच्या उजव्या बाजुच्या दरवाज्याने माग काढत घराच्या आवारातून मेन गेटने बाहेर पडुन घरासमोर गर्दीमध्ये उभे असलेल्या महिलेच्या अंगावर उडी मारून इशारा दिला. सदर महिला नामे मोहिनी पाटील हिचेकडे अधिक तपास केला असता ३,१८,०००/- रू. मुददेमाल मिळुन आला. सदर गुन्हा तपासात निष्पन्न झाले आहे. |




अशा प्रकारे माहे मे २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत खून - १, चोरी - १ असे एकुण - २ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.